## भूमिगत गटाराचे काम बेतू शकते नागरिकांच्या जीवावर

**गोंदिया :** शहरात सुरू असलेली गटार योजना नेहमीच वादाच्या भोवऱ्यात सापडली. गत चार वर्षापासून या योजनेचे काम सुरू आहे. यामुळे शहरवासीयांसह येथे विविध कामांसाठी आलेल्या नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे. गटार योजनेचे अर्धवट काम कधीही नागरिकांच्या जीवावर बेतू शकते. याकडे संबंधित विभाग व कंत्राटदाराने लक्ष देण्याची गरज आहे. येथील प्रशासनातर्फे गोंदिया शहर स्वच्छ, सुंदर चव विकसीत करण्यासाठी केले जाणारे प्रयत्न नक्कीच कौतुकास्पद आहेत. गत काही वर्षापासून शहरात भूमिगत गटार योजनेचे काम सुरू आहे. या कामामूळे नागरिकांना मोठा मनःस्ताप सहन करावा लागत आहे. योजनेच्या सुमार कामामूळे अपघातही झाले आहेत. योजनेच्या नालीत अडकून दोघांना जीव गमवावा लागला आहे. शहराच्या दक्षिण भागातून सुरू झालेली भूमिगत गटार योजनेचे काम आता शहराच्या उत्तर भागात सुरू आहे. ज्या वेगाने पाईप टाकण्यासाठी रस्ते खोदले जातात त्याच वेगाने पाईप टाकल्यानंतर काँक्रीट टाकणे अपेक्षित आहे. शहरातील रेलटोली परिसरातील रामदेवरा मंदिराच्या मागील दोन्ही रस्ते आठवडाभरापूर्वी खोदून पाईप टाकण्यात आले. त्यानंतर काँक्रीट टाकून रस्ता पुर्ववत करणे गरजेचे होते. मात्र कंत्राटदार व मजूरांचे चार दिवसांपासून दर्शन दुर्लभ झाले आहे. रस्त्यावर माती आहे, पाऊस हजेरी लावत आहे, यामुळे या रस्त्यावरून येजा करणे कठीण झाली आहे. वाहने नालीत फसत आहेत.


महासागर

जिल्हा कार्यालय, गोंदिया

जिल्हा प्रतिनिधी जयंत शुक्ला

पत्ता : दुसरा माळा, गौरक्षण मार्केट, गांधी प्रतीमा चौक, गोंदिया

संपर्क क्र ९८२२३८६९९९


## दृष्टिक्षेप

### ट्रॅक्टरची सायकलला धडक

**गोंदिया :** डुग्गीपार पोलिस ठाण्यांतर्गत नवेगावबांध-कोहमारा मार्गावरील कोकणा टी-पाईंट येथे ट्रॅक्टरने दुचाकीला धडक देवून चालकाला जखमी केल्याची घटना २२ जुलैची आहे. फिर्यादी चंद्रकुमार जनबंधु रा. कोकणाजमी यांचे वडिल देवराम जनबंधु हे सायकलने जात असतांना दुचाकी चालकाने मागून धडक देवून त्यांना जखमी केले. तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### दुचाकीची दुकानात शिरली

**गोंदिया :** नवेगावबांध पोलिस ठाण्यांतर्गत नवेगावबांध-अर्जुनी मार्गावरील संग्राम दुकानाजवळ दुचाकी अनियंत्रित झाल्याने पाणीपुरीच्या दुकानात जावून शिरली. यात एक मुलगा जखमी झाला. ही घटना २२ जूनची आहे. फिर्यादी रामअवतार बघेल रा. दाभनी यांची संग्राम कापड दुकानासमोर पाणीपुरीची दुकान असून आरोपीची दुचाकी अनियंत्रित झाल्याने ती दुचाकी दुकानात जावून शिरली. यातमध्ये फिर्यादीचा मुलगा निरज बघेल जखमी झाला. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### खड्डयात दुचाकी पडल्याने इसमाचा मृत्यू

**गोंदिया :** रावणवाडी पोलिस ठाण्यांतर्गत सावरी पेट्रोल पंपजवळ रस्त्याच्या सुरू असलेल्या कामात दुचाकी पडल्याने एकाचा मृत्यू झाल्याची घटना २२ जूनची आहे. प्रकाश सुरजलाल बेदरे रा. भानेगाव ता. लांजी जि. बालाघाट असे मृताचे नाव आहे. फिर्यादी अभिलोक बेदरे रा. भानेगाव हा मृतकासह दुचाकीसह एमपी ५०/झेडजी. ३२७४ ने बालाघाटवरून गोंदियाकडे येत असतांना सावरी पेट्रोल पंपजवळ रस्त्याचे काम सुरू असतांना मार्गावरील खड्डयात दुचाकी उलटली. यात प्रकाशचा मृत्यू झाला. फिर्यादीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### वाहनाच्या धडकेत इसमाचा मृत्यू

**गोंदिया :** आमगाव पोलिस ठाण्यांतर्गत कामठा-आमगाव मार्गावर वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने चालकाचा मृत्यू झाल्याची घटना २३ जून रोजीची आहे. अनिल देवाजी भावे रा. कामठा असे मृताचे नाव आहे. मृतक दुचाकी क्र. एमएच.३५/एटी. ३९६२ ने कामठा वरून आमगावकडे येत असतांना कामठा चौकात अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिली. या धडकेत अनिल भावे यांचा मृत्यू झाला. फिर्यादी पो.हवा. राजु गजपुरे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला.

### सामाजिक न्याय दिन आज

**गोंदिया :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिवस, २६ जून, हा संपूर्ण महाराष्ट्रात 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर गोंदिया जिल्ह्यात सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त किशोर भोयर यांनी केले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत गोंदिया जिल्हात कार्यरत शासकीय वसतीगृहे, शासकीय निवासी शाळा येथील इयत्ता १० वी व १२ वी मध्ये प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचे सत्कार तसेच सन २०२३-२४ मधील विविध पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त भाष्कर गायकवाड ता. तिरोडा यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य याबाबत मार्गदर्शन व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

# एमपीडीए अंतर्गत गुन्हेगारावर हद्दपारची कारवाई

## एक वर्षासाठी अमरावती कारागृहात स्थानबद्ध

**प्रतिनिधी / गोंदिया**

जिल्ह्यात गुन्हेगारीच्या प्रमाणावर आळा बसावा यासाठी मागील काही महिन्यांपासून गुन्हेगारांवर हद्दपारची कारवाई केली जात आहे. त्या अंतर्गत ग्रामीण पोलिस ठाणे हद्दितील आरोपी प्रेमसागर उर्फ मिथून भैय्यालाल ठाकरे रा. नवाटोला याला एमपीडीए अंतर्गत वर्ष भरासाठी पोलिसांनी अमरावती येथील कारागृहात स्थानबद्ध केले आहे.



सविस्तर असे की, गोंदिया ग्रामीण हद्दीतील धोकादायक गुंड प्रेमसागर उर्फ मिथुन भैय्यालाल ठाकरे (३१) मालमत्ते विरुध्द तसेच अवैध शस्त्र बाळगणे बाबतचे गुन्हे करीत असल्याने सदर इसमांविरुद्ध पोलीस ठाणे गोंदिया ग्रामीण येथे विविध प्रकारच्या ६ गंभीर गुन्ह्याची नोंद आहेत. तसेच साथीदारासह रात्री-अपरात्री आपल्या हातामध्ये घातक हत्यारे, शस्त्रे घेवुन पोलीस ठाणे हद्दीतील गरीब कामगार, सर्वसामान्य नागरीक, सर्वसामान्य व्यवसायिक तसेच व्यापारी यांना हत्याराचा धाक दाखवुन लोकांमध्ये दहशत माजवुन त्यांना मारहाण करून लुटण्याचे काम करीत असल्यामुळे या भागातील नागरीक भयग्रस्त झाले असल्याने त्यांना आपले दैनंदिन कामकाज करणे सुध्दा भितीदायक झाले होते. त्याचे असे कृत्यामुळे त्याचे घरातील लोकांना, नातेवाकांना, मोहल्यातील नागरिकांना त्याचेपासुन धोका निर्माण झाला होता. परिणामी पोलीसांनी तसेच कार्यकारी दंडाधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या कायदेशिर कारवाईचा सकारात्मक परीणाम स्थानबध्द इसमाचे वर्तणुकीत झाला नव्हता. उलट दिवसागणित त्याचे अवैध कृत्ये वाढत चाललेली होते. विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ (सुधारीत २०१५) नुसार मा. जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचेकडे 'धोकादायक व्यक्ती' अन्वये एका वर्षाकरीता स्थानबध्द करण्याचे प्रस्ताव पाठविला आले. दरम्यान जिल्हाधिकारी प्रजित नायर सदर इसमास आदेशान्वये मध्यवर्ती कारागृह अमरावती, जिल्हा अमरावती येथे स्थानबध्द क रण्याचे निर्देश दिले.

ही कारवाई पोलीस अधिक्षक गोरख भामरे, अपर पोलीस अधिक्षक नित्यानंद झा, उपविभागीय पोलीस अधिकारी रोहिणी बानकर , साहिल झरकर यांचे मार्गदर्शनाखाली स्था. गु. शा. गोंदिया येथील पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे गोंदिया ग्रामीण चे तत्कालीन पोलीस निरिक्षक चंद्रकांत काळे, स्थानिक गुन्हे शाखा गोदिया येथील प्रतिबंधक सेलचे म.पो. उप. नी. वनिता सायकर, अंमलदार पो.हवा. प्रकाश गायधने, दुर्गेश तिवारी, संजय चव्हाण, छगन विठ्ठले तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्या. तिरोडा येथील अंमलदार गोस्वामी , पो. ठाणे गोंदिया ग्रामीण देवानंद पारधी यांनी कार्यवाही पार पाडली.

# धाड कारवाई ; १९० जनावरांची सुटका

**प्रतिनिधी / सालेकसा**

तालुक्यातील मौजा पिपरिया टेंभुटोला (घिनाई तलाव) जंगल परिसरात जनावरांना बेकायदेशीरपणे बांधुन ठेवण्यात आले असल्याची गोपनीया माहिती पोलिसांना मिळाली. सालेकसा पोलीस निरीक्षक भूषण बुराडे यांच्या नेतृत्वात २३ जून रोजी धाड कारवाई करून १९० जनावरांची सुटका करण्यात आली. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सविस्तर असे की, पिपरिया जंगल शिवारात आरोपींनी लाल/तांबडा, पांढऱ्या आणि काळ्या रंगातील लहान-मोठ्या गोवंश जातीच्या एकूण १९० जनावरांचा बेकायदेशीर साठा जंगल परिसरात केला होता.

सदर जनावरे कत्तलीसाठी वाहतूक करण्याच्या उद्देशाने ठेवण्यात आले होते. या जनावरांची एकूण किंमत ३ लाख ६५ हजार रुपये होती ही बाब पोलिसांना मिळताच, धाड कारवाई करून जनावरांची सुटका केली. ही कारवाई सदर कारवाई गोंदिया जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मा. गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा, तसेच आमगाव उपविभागाचे डीवायएसपी प्रमोद मडामे यांच्या मार्गदर्शनात सालेकसा पोलीस निरीक्षक भूषण बुराडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या प्रकरणी महेश मनगटे (४०) रा. पानगाव, पुनाराम रत्नाकर (४०) गोवारीटोला यांना अटक करून फिर्यादी पोशि. दिनेश गौतम यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# मदतीसाठी नागरिकांचा उपविभागीय कार्यालयासमोर आंदोलन

**प्रतिनिधी / अर्जुनी/मोर**

आरोग्य विभागातील गैरप्रकार सर्वस्तुत आहेत. त्यातच तालुक्यातील नवेगावबांध येथील ग्रामीण रुग्णालायत एका महिलेवर सहा महिन्यापुर्वी चुकीची शस्त्रक्रिया झाल्याने तिचा मृत्यू झाला होता. मात्र या घटनेनंतरही दोषींवर कारवाई तसेच पीडितांना कोणतीही मदत मिळाली नाही परिणामी या मागणीला घेवून आदिवासी समाजाच्यावतीने उपविभागीय कार्यालयासमोर आज २४ जून रोजी आंदोलन करण्यात आले.

सविस्तर असे की, तालुक्यातील नवेगाव बांध येथील शासकीय रुग्णालयात रागिनी अनिल मसराम या महिलेवर सहा महिनेपूर्वी प्रसूतीनंतर चुकीची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. या दुर्लक्षामुळे आठ दिवसांत तिचा मृत्यू झाला. परंतु या गंभीर घटनेनंतरही मृत महिलेच्या कुटुंबीयांना कोणतीही शासकीय मदत मिळालेली नाही. या निष्काळजीपणाच्या विरोधात आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी २४ जून ला उपविभागीय कार्यालय येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. आंदोलनात परिसरातील आदिवासी बांधव, महिलावर्ग आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या आंदोलनाचे आयोजन आदिवासी क्रांतीसुर्य बिरसा मुंडा समिती नवेगाव बांध, राणी दुर्गावती आदिवासी महिला सेवा समिती, विरंगणा राणी दुर्गावती आदिवासी सेवा समिती गोंदिया, भगवान बिरसा मुंडा सेवा समिती अर्जुनी मोर, आणि अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद अर्जुनी मोर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. दरम्यान उपविभागीय अधिकारी वरुण शहारे यांच्याशी आंदोलनकर्त्यांनी चर्चा केली. तसेच मागण्यांचे निवेदन सादर केले. या जनआंदोलनाच्या माध्यमातून आदिवासी समाजाने आपल्या हक्कासाठी आवाज बुलंद केला असून प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली.

# पवार महासभा युवा कार्यकारिणीच्या जनसंवाद सचिवपदी रहांगडाले

**गोंदिया :** राष्ट्रीय क्षत्रिय पवार महासभेच्या युवा कार्यकारिणीच्या जनसंवाद सचिवपदी भागचंद्र रहांगडाले यांची नियुक्ती २२ जून रोजी स्थानिक पोवार बोर्डिंग येथे आयोजित राष्ट्रीय क्षत्रिय पवार महासभेच्या अधिवेशनात झाली. ते गोरेगाव तालुक्यातील सटवा येथील रहिवासी आहेत. महाविद्यालयीन जीवनापासून समाजकार्यात सक्रीय आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत राष्ट्रीय क्षत्रिय पवार महासभेच्या वतीने त्यांना युवक कार्यकारिणीच्या जनसंवाद सचिव पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांनी निवडीचे श्रेय राष्ट्रीय क्षत्रिय पवार महासभेचे माजी महासचिव प्रा. एच. एच. पारधी, राष्ट्रीय क्षत्रिय पवार महासभेचे माजी संघटनसचिव खेमेंद्र कटरे, पवार प्रगतिशील मंचचे माजी अध्यक्ष ॲड. पी. सी. चव्हाण, प्रगतिशील शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष शिशिर कटरे, राष्ट्रीय क्षत्रिय पवार महासभेचे संघटन सचिव राजकुमार पटले, पवार प्रगतिशील मंचचे माजी संचालक महेंद्र बिसेन, पवार प्रगतिशील मंचचे पदाधिकाऱ्यांना दिले आहे.

# कृषी पंपाच्या वीज जोडणीपासून शेतकरी वंचित

**प्रतिनिधी / अर्जुनी/मोर**

सिंचनासाठी गैरसोय होऊ नये, यासाठी महावितरणच्या वीतने शेतकऱ्यांना कृषी वीज पंप जोडणी करण्यात येते. मात्र महावितरणच्या जाचक अटीमुळे शेतकरी कृषी पंपाच्या वीज जोडणीपासून वंचित आहे. या प्रकरणी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था संघाच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन देवून वीज जोडणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

खरीप हंगामातील धान पेरणीचे दिवस तोंडावर आले असताना, पाण्याशिवाय पिके घेण्याचे दिवास्वप्न दाखवणाऱ्या शासनाच्या धोरणावर संघाने खरमरीत शब्दांत टीका केली आहे. 'एकीकडे सरकार बोलते शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करतो, तर दुसरीकडे डिमांड रक्कमेसारखे अडथळे निर्माण करून शेतकऱ्यांचे कंबरडे मोडते,' असा सवाल उपस्थित करत ही व्यवस्था शेतकऱ्यांच्या जीवनाशी थट्टा करत असल्याचा आरोप करण्यात आला. संघाचे अध्यक्ष ललितकुमार बाळबुजदे यांनी यांच्या वतीने निवेदन देण्यात आला असून जर वीज जोडण्या तत्काळ सुरू झाल्या नाहीत, तर तालुक्यातील शेतकरी रस्त्यावर उतरतील. असा इशाराही दिला आहे. तालुक्यातील विविध संस्था, सहकारी बँका आणि शेतकरी संघटनांनी या लढ्यात पाठिंबा दिला आहे.

# पावसाअभावी खरीप हंगाम लांबणीवर!



*धान नर्सऱ्यांची कामे रखडली*

**प्रतिनिधी / गोंदिया**

पावसाचा मृग नक्षत्र कोरडा गेल्यावर आद्र नक्षत्राकडून मोठया पावसाची अपेक्षा आहे. आद्र नक्षत्र लागून दोन दिवस उजाडले मात्र अपेक्षीत पाऊस कोसळला नाही. पेरणीसाठी किमान शंभर मिली मीटर पाऊस होणे गरजेचे आहे. आतापर्यंत सरासरीच्या केवळ ३४.७ मिमीच पाऊस झाला आहे. शेतकरी पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहत असून पावसाअभावी खरीप हंगाम लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. पावसाचा, तलावाचा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्हयात जून ते सप्टेंबर या कालावधीत १२२० मिमी सरासरी पाऊस कोसळतो. १ जून ते २४ जून या कालावधीत सरासरीच्या १५४.२ मिमी पाऊस होणे अपेक्षित असताना केवळ ३४.७ मिमी म्हणजे केवळ २२.५ टक्केच झाला.

जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात १.९० लाख क्षेत्रात धानाची लागवड होणे आहे. तत्पुर्वी शेतकरी धान नर्सरी टाकतात. नर्सरींची योग्य वाढ व रोवणी योग्य पाऊस झाल्यावरच धान लागवड केली जाते. नर्सरीसाठी शंभर मिमी पावसाची आवश्यकता असते. यंदा मात्र जिल्ह्यात सर्वदूर जोरदार पाऊसच झाला नाही. अल्प पावसामुळे धान नर्सरींची कामे खोळंबली आहेत. परिणामी हंगाम लांबण्याची शक्यता नाकारता येत नाही. पावसाच्या अनियमितपणामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. खरीप हंगाम लांबल्यास उत्पन्नावर परिणाम होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजावर विश्वास ठेऊन अनेक शेतकऱ्यांनी अल्प पावसात धान पेरणी केली. धान अंकुरले मात्र ते पावसाअभावी करपले.


**दक्षिण पूर्व मध्य रेल्वे**

**ई-निविदा सूचना**

**अनुक्रमांक (1) निविदा क्रमांक एस.ई.सी.आर. - मुख्यालय - इंजि.- बी.एल.-25-26-04**

**काम:** बिलासपूर विभागातील वरिष्ठ विभाग अभियंता (पुल) / बिलासपूर यांच्या अधिकारक्षेत्रात पूल क्रमांक 06 अप आणि डाउन (8x18.30 मी.) आणि पूल क्रमांक 12 डाउन (3x18.30 मी.) च्या पीएससी गर्डरमध्ये साइड पाथवेची तरतूद.

**अंदाजे किंमत:** - रु. 1,90,14,665.58/- **सुरक्षा रक्कम:** - रु. 2,45,100/-

**अनुक्रमांक (2) निविदा क्रमांक एस.ई.सी.आर. - मुख्यालय इंजि.- बी.एल.-25-26-05**

**काम:** बिलासपूर विभागातील वरिष्ठ विभाग अभियंता (पुल)/शहडोल यांच्या अखत्यारीत पूल क्रमांक 24 के डाउन (2x12.20 मी.), 26 के डाउन (3x12.20 मी.), 36 के डाउन (3x12.20 मी.), 40 के डाउन (4x12.20 मी.), 4 सीआयसी (3x12.20 मी.) आणि 211 तिसरी लाईन (1x12.20 मी.) च्या पीएससी गर्डरमध्ये साइड पाथवेची तरतूद.

**अंदाजे खर्च:-** रु. 1,84,29,633.47)/- **सुरक्षा रक्कम:-** रु. 2,42,200/-

**अनुक्रमांक क्रमांक (3) निविदा क्रमांक एस.ई.सी.आर. - मुख्यालय - इंजि.- बी.एल. 25-26-06**

**काम:** रायपूर विभागातील वरिष्ठ विभाग अभियंता (पुल)/रायपूर यांच्या अखत्यारीत विविध पीएससी गर्डर पुलांमध्ये साइड पाथवेची तरतूद.

**अंदाजे खर्च:-** रु. 7,46,60,798.45/- **सुरक्षा रक्कम:-** रु. 5,23,300/-

**अनुक्रमांक (4) निविदा क्रमांक एस.ई.सी.आर.- मुख्यालय इंजि.- बी.एल.-25-26-07**

**काम:** नागपूर विभागातील वरिष्ठ विभाग अभियंता (पूल)/गोंदिया यांच्या अखत्यारीतील विविध पीएससी गर्डर पुलांमध्ये साइड पाथवेची तरतूद.

**अंदाजे खर्च:-** रु. 3,22,39,841.59/- **सुरक्षा रक्कम:-** रु. 3,11,200/-

**अनुक्रमांक (5) निविदा क्रमांक एस.ई.सी.आर.- मुख्यालय- इंजि.- बी.एल.-25-26-08**

**कार्य:** वरिष्ठ विभाग अभियंता (पूल)/नैनपूर, नागपूर विभाग यांच्या अखत्यारीतील गोंदिया-नैनपूर विभागातील विविध पीएससी गर्डर पुलांमध्ये साइड पाथवेची तरतूद.

**अंदाजे खर्च:-** रु. 9,84,96,680.11/- **सुरक्षा रक्कम:-** रु.6,42,500/-

**अनुक्रमांक (6) निविदा क्रमांक एस.ई.सी.आर. - मुख्यालय - इंजि.- बी.एल.-25-26-09**

**काम:** वरिष्ठ विभाग अभियंता (पूल)/नैनपूर, नागपूर विभाग यांच्या अखत्यारीतील छिंदवाडा नैनपूर-मंडला फोर्ट आणि नैनपूर-ग्वारीघाट विभागातील विविध पीएससी गर्डर पुलांमध्ये साइड पाथवेची तरतूद.

**अंदाजे खर्च:-** रु. 8,83,09,918.35/- **सुरक्षा रक्कम:-** रु. 5,91,600/- **बोली प्रक्रियेची सुरुवात तारीख:** 27.06.2025 **निविदा भरण्याची शेवटची तारीख:** 11.07.2025 रोजी 4:30 वाजता


वरील कामाबद्दल आवश्यक आणि संपूर्ण माहिती उपमुख्य अभियंता पूल / मुख्यालय कार्यालय किंवा www.ireps.gov.in वेबसाइटवरून मिळू शकते.

उपमुख्य अभियंता पूल/मुख्यालय

सीपीआर/10/AM/125 द.पू.मं. रेल्वे बिलासपुर

South East Central Railway @secrail





महासागर गोंदिया
गुरूवार, दि.२६ जून २०२५
पान ६

## जिल्ह्यातील ८७ गावांना बॅक वॉटरचा धोका

**गोंदिया :** जिल्ह्याला लहान व मोठ्या अशा सहा नद्या लाभल्या आहेत. या नद्या जीवनदायिनी म्हणून ओळखल्या जातात. पण, पावसाळ्यात त्या रौद्ररूप धारण करतात. या नदीकाठावरील तब्बल ८७गावांतील नागरिकांना 'बैंक वॉटर'च्या धोक्याचा सामना करावा लागतो. दरवर्षी यापैकी निम्म्या गावांत पुराचे पाणी शिरते.

जिल्ह्यात अद्यापही दमदार पाऊस झाला नसल्याने नद्या कोरड्या आहेत. लहानमोठ्या नाल्यांचे पाणी वैनगंगा, गाढवी, वाघ, चुलबंद, बहेला, पांगोली नद्यांना जाऊन मिळते. जिल्ह्यातील सर्वात मोठी नदी वैनगंगा आहे. या नदीचे पात्र खोल असल्यामुळे या नदीतील पाणी सहसा गावांमध्ये शिरत नाही. मात्र, अन्य नद्या जिल्ह्यातील नागरिकांसाठी पावसाळ्यात पूर आल्यास काळ बनून येतात. सालेकसा, आमगाव व गोंदिया तालुक्यातील अनेक गावे वाघ व पांगोली या दोन नद्यांपासून येणाऱ्या पुराच्या पाण्याने बाधित होतात. तर गाढवी, चुलबंद, बहेला या नद्यांचे पाणी सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव या तालुक्यांतील गावांमध्ये शिरते. पुराच्या पाण्यापासून बाधित होणारी जिल्ह्यात ८७ गावे आहेत. या गावांतील नागरिकांना पुराच्या पाण्यापासून व जीवितहानी टाळता यावी, यासाठी जिल्हा प्रशासन जिल्ह्यात प्रशिक्षण, जनजागृती कार्यशाळा जनजागृती राबविते. कार्यक्रमाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या माध्यमातून नैसर्गिक आपत्तीच्या वेळी घडणाऱ्या घटनांपासून जीव, मालमत्तेची हानी रोखण्यासंदर्भात प्रशिक्षण देण्यात येते. बचाव व मदतीचे अत्याधुनिक साहित्य पथकात उपलब्ध आहे. त्यामुळे आपत्ती काळात मदतीसाठी विभाग २४ तास सज्ज आहे.

# मार्गाच्या दुरुस्तीसाठी आंदोलन करावे लागणार का?

### गावकऱ्यांचा संतापजनक सवाल : मोहगाव- बोरी रस्त्याचे तीनतेरा

अर्जुनी मोरगाव : तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांचे आजघडीला दैनावस्था झाला आहे. प्रवास्यांना जीव मुठीत घेवून खड्डेमय मार्गावरून प्रवास करावा लागत आहे. त्यातच मोहगाव ते बोरी मार्गा मोठ-मोठी पडले आहे. तसेच पावसाळ्याचे दिवसात खड्ड्यामध्ये पाणी साचत असल्याने रस्त्याचे तलावाचे स्वरुप येत आहे. परिणामी या मार्गावरून प्रवास करावा तरी कसा ? अस सवाल गावकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. मात्र संबंधित विभाग व जप्रतिनिधी झोपेजे सोंग करून या प्रकाराकडे दुर्लक्ष करीत आहेत. परिणामी मार्गाच्या दुरुस्तीसाठी रस्त्यावरू उतरून आंदोलन करावे लागणार का ? असा सवाल आता गावकरी उपस्थित करू लागले आहे.



अर्जुनी मोरगाव तालुक्याच्या महागाव जिल्हा परिषद क्षेत्रात बहुतांश रस्त्यांचे तीनतेरा वाजल्याने अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. महागाव ते बोरी, बोरी ते कोरंबीटोला टी-पॉईंट, जाणवा ते येगांव, शिरोली ते मालकनपुर, मोरगाव, महगांव ते बंध्या या भागातील गावाच्या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून मार्गावरील गिट्टी पूर्णता उखडली आहे. महागाव हे मोठी बाजारपेठ आहे तसेच महाविद्यालय, प्राथमिक शाळा, आरोग्य दवाखाने तलाठी कार्यालय आहेत . बाजारपेठ असल्यामुळे परिसरातील नागरिक महागाव या ठिकाणी दररोज ये-जा करीत असतात. या मार्गाची अनेक वर्षापासून दयनीय अवस्था झाली असून या रस्त्यावरून चालताना नागरिकांना व शाळकरी मुलांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. मार्गाची डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात आली. मात्र जनप्रतिनिधी महागाव ते बोरी मार्गासह तालुक्यातील रस्त्याच्या डागडुजीकडे कानाडोळा करीत आहेत. यामुळे रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रस्त्यावरून उतरून आंदोलन करावे लागणार का? असा सवाल गावकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

#### खड्ड्यातून मार्ग शोधून करावा लागतो प्रवास

तालुक्यातील बोरी, महागाव, मालकनपूर, मोरगाव हा मार्ग खड्ड्यांचा मार्ग म्हणून नावारुपास आला आहे. या गावांती रस्त्याची दैनावस्था पाहून प्रवासी या मार्गावरून प्रवास करणे टाळ असून अधिकचा प्रवास आपल्या गंतव्यस्थळी पोहचत आहे. उल्लेखनीय असे की , या बोरी, महागाव, मालकनपूर, मोरगाव या गावांतील मार्गावरून प्रवास करणे भाग पडले तरी खड्ड्यातून मार्ग शोधून प्रवासा करावा लागत आहे. दरम्यान अनेक वेळा अपघाताला समोर जावून किरकोळ जखमी सुद्धा व्हावे लागत असून हा मागे आता प्रवास्यासाठी जीव घेणे ठरला आहे.

## वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी चिंतेत

**गोंदिया :** सध्या खरीप हंगामाच्या कामांना चांगलीच गती मिळाली आहे. येत्या ५ ते १० दिवसांत शेतकरी धानाचे पऱ्हे भरण्यात व्यस्त होणार आहेत. जमिनीची पूर्वतयारी म्हणून शेतीतील अनेक कामे शेतकऱ्यांना करावी लागतात. परंतु सद्यःस्थितीत शेत कामाकरिता मनुष्यबळ मिळत नसल्याने शेतकरी वर्ग चांगलाच चिंतेत पडला आहे. त्यामुळे एका दिवसाचे काम दोन दिवसांवर जात असल्याने शेतकऱ्यांचे शेतीच्या खरीप हंगामाचे गणित बिघडत चालले आहे.

ग्रामीण भागात विभक्त कुटुंब पद्धतीमुळे घरात सदस्यांची संख्या मर्यादित झाली आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना शेतीसाठी यांत्रिकीकरणासह मजुरांची गरज भासू लागली आहे. सध्या मात्र अनेक कारणांनी शेतीच्या कामासाठी मजूर मिळत नाहीत. मजुरांचा तुटवडा जाणवत असल्याने उपलब्ध होणाऱ्या मजुरांना जास्त मजुरी देऊन कामे करावी लागत आहेत. त्यातच इंधनाचेही दर झपाट्याने वाढल्याने ट्रॅक्टरने केल्या जाणाऱ्या कामांचाही दर वाढला आहे. परिणामी उत्पादन खर्चात वाढ झाल्याने शेतकरी मात्र बेजार झाला आहे.ग्रामीण भागातूनही उद्योगीकरण तसेच शहरीकरणामुळे शेतामध्ये मजुरांना भरमसाठ मजुरी देऊनही मजूरवर्ग मिळत नाही. बहुतांश मजूरवर्ग उन्हामध्ये काम करण्याऐवजी कंपनीच्या कामासाठी जास्त पसंती देताना दिसत आहे. त्यामुळे शेतमजुरांचा तुटवडा निर्माण झाला आहे.

## आ. बडोले यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत व शालेय साहित्य वाटप



**सडक अर्जुनी :** महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि शालेय शिक्षणमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा प्रवेशोत्सव २०२५-२६ राज्यभर राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये आज आमदार तथा माजी मंत्री आ. राजकुमार बडोले यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

इयत्ता पहिलीत नव्याने प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे तसेच इतर वर्गातील विद्यार्थ्यांचेही मनपूर्वक स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप आमदार तथा माजी मंत्री राजकुमार बडोले यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान आमदार बडोले यांनी विद्यार्थ्यांशी तसेच शिक्षकांशी संवाद साधला. शालेय जीवनातील अनुभव कथन करत शिक्षणाचे आयुष्यातील महत्त्व, जिद्द, मेहनत आणि चिकाटी यावर भर दिला. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास करून आपले भवितव्य घडवावे असे मार्गदर्शन त्यांनी केले. यावेळी आमदार बडोले यांनी शाळेच्या एकूण परिस्थितीचा आढावा घेत शाळेतील विद्यार्थ्यांची वाढती संख्या पाहून समाधान व्यक्त केले. तसेच शाळा व्यवस्थापन समितीकडून करण्यात आलेल्या मागण्या मान्य करून त्या मंजूर करण्याचे आश्वासन दिले. तसेच शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचे मजबूत पायाभूत दगड आहे. आजच्या युगात आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास विद्यार्थी वेगाने प्रगती करू शकतात. यासाठी शिक्षण संस्थांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. शाळेच्या विकासासाठी कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही. तसेच, शाळेच्या भौतिक अडचणी, सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी वैयक्तिक लक्ष देण्याच्या सूचना शिक्षक बांधवांना दिल्या. या कार्यक्रमास पंचायत समितीचे सभापती चेतन वडगाये, जिल्हा परिषद सदस्य डॉ. भुमेश्वर पटले, अनिल बिलिया, गटशिक्षणाधिकारी एल. चव्हाण, प्रशांत शहारे, सरपंच योगेश्वरी चौधरी, केंद्रप्रमुख एन. सी. बीजेवार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लोमेश्वर कुरसुंगे, उपाध्यक्ष मेघनाथ उंदीरवाडे, विजय गावराने, सूर्यकांता चौधरी, शितल नंदेश्वर, डीलेश्वरी कुरसुंगे, मिलिंद येल्ले, मुख्याध्यापक देशपांडे सह सर्व शिक्षकवृंद आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अखेर त्या रस्त्याची पुनर्बांधणी

### इर्री येथील निकृष्ट रस्ता बांधकाम प्रकरण



**गोंदिया :** तालुक्यातील इर्री येथील इर्री - करंजी - कामठा मार्गाचे नुकतेच डांबरीकरण करण्यात आले होते.सदर डांबरीकरण निकृष्ट दर्जाचे असल्याचे आरोप करीत येथील नागरिकांनी कामाच्या चौकशी ची मागणी लावून धरली होती.अखेर कंत्राटदाराने या रस्त्याची पुनर्बांधणी करून दिली त्यामुळे गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

जुन च्या दुसऱ्या आठवड्यात बांधकाम विभागातर्फे इर्री- करंजी - कामठा मार्गाचे डांबरीकरण करण्यातआले होते. सदर रस्ता बांधकाम रात्रीच्या अंधारात करुन कंत्राटदारांनी निकृष्ट बांधकाम केले असा आरोप परिसरातील नागरिकांनी लावून याची तक्रार बांधकाम विभागाकडे केली होती.माध्यमांनी सूद्धा या प्रकरणाची दखल घेत प्रकरण चव्हाट्यावर आणले.त्यातच आमदार विनोद अग्रवाल यांनी सुध्दा याविषयी बांधकाम विभाग व कांत्राटदाराला चांगलेच धारेवर धरले होते. अखेर या प्रकरणाची दखल घेत बांधकाम विभागाने १७ जून रोजी कांत्रादरकडून या रस्त्याची पुनर्बांधणी करून घेतली. आता सदर रस्ता गुळगुळीत झाल्यामुळे गावकऱ्यानी समाधान व्यक्त केले.

## तेल व डाळीचे भाव आवाक्यात

**गोंदिया :** केंद्र सरकारने आयात शुल्क १० टक्क्यांपर्यंत कमी केल्याने खाद्यतेलाच्या दरात घसरण झाली आहे. दुसरीकडे डाळींचे भावही बऱ्यापैकी आवाक्यात आले आहेत. त्यामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी भाजीपाल्यासह किराणा साहित्याचे भाव मात्र कडाडलेच आहेत. तात्पुरत्या स्वरूपात सध्या कमी झालेले तेल आणि डाळींचे भाव पाहता खिचडी बनवायची की दाल तडका, याचे बेत आखले जात आहेत.मागील काही महिन्यांत सर्वच किराणा साहित्यासह भाजीपाला, डाळ, तांदूळ, ज्वारी, गहू, तेल, तूप, साखर अशा साहित्याचे दर वाढल्यामुळे महागाईची झळ सामान्यांना सहन करावी लागली आहे. दुसरीकडे सर्वच प्रकारच्या खाद्यपदार्थाचे दर वाढल्यामुळे महागाईला सामोरे जाण्याची वेळ आली. यात आंतरराष्ट्रीय बाजारपेठ, अवकाळी पाऊस आणि विविध प्रकारच्या आयात-निर्यात धोरणांचाही परिणाम वस्तूंच्या दरावर झाला आहे. यामुळे मागील काही दिवसांपासून झालेल्या दरवाढीने त्रस्त असलेल्या गृहिणींना दिलासा मिळाला आहे.

## शाळामध्ये हिंदी भाषा सक्ती विरोधात मनसेचे निवेदन



**गोंदिया :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशावरून जिल्हा परिषद,नगर परिषद शाळांसह खासगी शाळामध्ये हिंदी भाषा सक्तीची करण्यात येऊ नये या मागणीचे निवेदन गोंदिया जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी व नगरपरिषद प्रशासनाला गोंदिया शहर मनसेच्यावतीने देण्यात आले.तसेच शहरातील सर्व शाळेतील मुख्याध्यापकांना भेटून संवाद साधून निवेदन देण्यात आले.

राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये शासनाकडून प्राथमिक शाळेत त्रिभाषा सूत्र व त्यामध्ये हिंदीसक्तीकरण विरोधात निवेदन देण्यात आले. पूर्वी शालेय शिक्षण अभ्यासक्रमात दोनच भाषा अनिवार्य होत्या(मराठी व इंग्रजी) पण त्यामध्ये शासनाकडून तिसरी भाषा हिंदी समाविष्ट करुन लादण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मायबोली मराठीची अवहेलना सरकारकडून होत असल्याचा आरोप महाराष्ट्र सैनिकांनी केले.चर्चेदरम्यान महाराष्ट्र शासनाने हा निर्णय कधी जर मागे नाही घेतला तर शहरात व जिल्ह्यात मोठा आंदोलन करण्याचा इशारा दिला.याप्रसंगी मनसे गोंदिया शहर अध्यक्ष सुरेश नानू चौधरी, शहर उपाध्यक्ष सुमित कावळे, शहर उपाध्यक्ष डिलेश उके, शहर उपाध्यक्ष क्षितिज वैद्य, छोटा गोंदिया शाखाप्रमुख कार्तिक राऊत, शहर प्रसिद्धीप्रमुख कृष्णा ढोंगे तसेच सर्व पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक प्रामुख्याने उपस्थित होते.

## 35 हजार शेतकऱ्यांना 235 कोटींचे पीककर्ज वाटप

### जिल्हा बँकेची आघाडी कायम ; ३६१ कोटी रुपयांचे उद्दिष्ट

**गोंदिया :** खरीप हंगामात शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप करण्यासाठी शासन आणि नाबार्डने जिल्हा बँकेला ३६१ कोटी रुपयांच्या पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिले आहे. यापैकी गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आतापर्यंत ३५७३१ शेतकऱ्यांना २३५ कोटी ४७ लाख ६२ हजार रुपयांच्या पीककर्जाचे वाटप केले आहे. तर बँकेच्या तुलनेत जिल्हा बँकेने नेहमीप्रमाणे पीककर्ज वाटपात आघाडी कायम ठेवली आहे.

शेतकऱ्यांना खरीप हंगामादरम्यान पैशाची अडचण भासू नये, सावकार आणि नातेवाइकांच्या दारात उभे राहण्याची वेळ त्यांच्यावर येऊ नये यासाठी नावार्ड आणि शासनाच्या



माध्यमातून जिल्हा, राष्ट्रीयीकृत आणि ग्रामीण बँकांना खरीप व रब्बी हंगामात पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिले जाते. यंदा बँकांना खरीप आणि रब्बी हंगामात एकूण ६५० कोटी रुपयांच्या पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे यात सर्वाधिक ४५० कोटी रुपयांचे उद्दिष्ट जिल्हा बँकेला खरीप आणि रब्बी हंगामासाठी दिले आहे. यापैकी जिल्हा बँकेने आतापर्यंत ३५ हजार ७३१ शेतकऱ्यांना २३५ कोटी रुपयांच्या पीककर्जाचे वाटप केले आहे. तर राष्ट्रीयीकृत आणि ग्रामीण बँकांनीसुद्धा बऱ्याच प्रमाणात पीककर्जाचे वाटप केले आहे.

इतर बँकाच्या तुलनेत जिल्हा बँकेतून पीक कर्जाची उचल करण्याची प्रक्रिया ही सुलभ आहे. त्यामुळे शेतकरी जिल्हा बँकेतून पीककर्जाची उचल करण्यास प्राधान्य देतात. त्यामुळेच जिल्हा बँकेने पीककर्ज वाटपात आघाडी कायम ठेवली आहे.

## विश्व हिंदू परिषदचे तीन दिवसीय अभ्यास वर्ग उत्साहात

**तिरोडा :** विश्व हिंदू परिषद स्थापनेचे ६१ वर्ष पुर्ण झाले व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपले १०० वर्ष पूर्ण करीत आहे. त्या अनुषंगाने जिल्हा विश्व हिंदू परिषदच्या कामाचा विस्तार, कार्यकर्त्यांचा शारीरिक, बौद्धिक व वैचारिक दृष्टीने सक्षम बनविण्यासाठी तीन दिवसीय अभ्यास वर्गाचे आयोजन २० जूनपासून तिरोडा येथील मधुराज सेलिब्रेशन लॉन येथे करण्यात आले.

दरम्यान २० जूनला सायंकाळी देवश मिश्रा यांच्या हस्ते पुर्जा अर्चना करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी तस्तंग पद्धती बाबात माहिती देण्यात आली. तर २१ जूनला योग अभ्यास करण्यात आले. यावेळी डॉ. हितेश मंत्री व उरकुडा पारधी, भीमक




शर्मा उपस्थित होते. यावेळी वेगवेगळया सत्रामध्ये धर्मांतरण,जेहादी आंतक, लव्ह जिहाद, वक्फ बोर्ड या विषयावर वक्त्यांनी जाणकारी दिली, तसेच कार्यकर्त्यांचा व्यक्तित्व विकासा बाबत माहिती देण्यात आली. २२ जून रोजी योगाभ्यासानंतर प्रखंडसा चर्चा बैठक घेऊन आपल्या प्रखंडाची माहिती देण्यात आली आणि आगामी संघटनांच्या उत्सवाची माहिती देण्यात आला. जसे स्थापना दिवस, दुर्गाष्ठमी, गोपाष्ठमी, शौर्य दिवस, धर्म रक्षा दिवस, समरसता दिवस, राम उत्सव हे गाव शाखे पर्यंत साजरे करावेत जेणेकरून विश्व हिंदू परिषदेचे कार्य घराघरात पोहोचतील, तसेच या जिल्हा अभ्यास वर्गाप्रमाणे प्रखंड अभ्यास वर्ग आप आपल्या प्रखंडामध्ये साजरे करावे ही माहिती देण्यात आली वं समारोप कार्यक्रमात शहरातील समाजसेवी मान्यवरांना बोलाऊन वर्गाचे समापन करण्यात आले.

### आधीच घ्या काळजी, अन्यथा करावी लागणार दुबार पेरणी

**गोंदिया :** मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसानंतर मान्सूनचा पाऊस आता पडायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकरी शेतीची मशागत आटोपून पेरणीची लगबग करू लागले आहेत.

काही ठिकाणी पेरणीला सुरुवात झाली आहे, तर काही ठिकाणी पेरणीयोग्य पाऊस नसल्याने शेतकऱ्यांनी पेरणी केलेली नाही. पेरणी करताना शेतकऱ्यांनी योग्य काळजी घ्यावी. पेरणी करताना शेतात पुरेसे ओल तसेच योग्य बियाणे गरजेचे असून, शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या सल्ल्यानुसारच शेतात पेरणी करणे योग्य राहणार आहे. पाऊस भरपूर झाल्यावरच पेरणी करा, अन्यथा दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते.

## ठाणेगाव जि.प. शाळा इमारतीचे लोकार्पण

**तिरोडा :** तालुक्यातील ठाणेगाव येथे २३ जून रोजी अदानी फाउंडेशनच्या वतीने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ठाणेगावच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आहे. दरम्यान आमदार विजय रहांगडाले यांच्या हस्ते सदर इमारतीचे लोकर्पण पार पडले. यावेळी अदानी प्रकल्पाचे मयंक दोशी यांनी सांगितले की, अदानी प्रकल्पाच्या वतीने परिसरातील शाळा तसेच गावांचा विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

यावेळी मंचावर अदानी पावर लि. स्टेशनचे हेड मयंक दोशी, जि.प.सदस्य मौधुरी रहांगडजाले, अदानी



फाउंडेशनचे प्रमुख बिमुल पटले, सरपंच आय. टी. पटले, उपसरपंच कैलाश पटले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेश ठाकुर तसेच ग्रा.पं. पदाधिकारी व शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान आ. रहांगडाले यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गुणवत्ते सोबतच भौतिक सुविधा सुद्धा अति आवश्यक असून अदानी फाउंडेशन तिरोडाच्या मार्फत तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात येत आहे तसेच जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांची कौशल्य वृद्धी करण्यासाठी कार्यक्रम अंमलबजावणी करावी अशा सूचना केल्या. तर माधुरीताई रहांगडाले यांनी अदानी फाउंडेशन मार्फत शालेय इमारत बांधकाम दोन वर्ग खोली व एक वरांडा करून दिल्याबद्दल अदानी फाउंडेशनचे आभार मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेश ठाकूर यांनी केले संचालन शिक्षिका ममता ठाकूर तर आभार प्रदर्शन शिक्षिका शारदा पारधी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक श्री एस सी कोठे यांच्या सह सर्व शिक्षक वृंद यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.

## ऐन हंगामात बियाण्यांच्या किंमतीत वाढ

**देवरी :** यावर्षीच्या खरीप हंगामाला सुरुवात झाली असून शेतकरी बी-बियाणांची जुळवाजुळव करण्यात गुंतला आहे. काही प्रमाणात पाऊस झाल्याने नागरणीच्या कामाला वेग आला आहे. मात्र, यावर्षी मागील वर्षी पेक्षा बियाण्यांच्या किमतीमध्ये दहा टक्क्याने वाढ झाल्याने शेतकऱ्यांचे खरीप पिकाबाबतचे नियोजन भरकटलेले असून, शेतकऱ्यांची अर्थकोंडी होताना दिसत आहे. परिणामी, शेतकरी हतबल झाले आहेत.

कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. अशातच शेती करिता लागणारा उत्पादन खर्च वाढल्याने व शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या गुंता वाढत असून शेती परवडण्यासारखी राहिलेली नाही. धानाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. यंदा शासनाने हमीभावावर नाहीच्या बरोबर वाढ केली. तर बियाण्यांच्या किमतीत दहा टक्क्यांनी वाढ झाल्याने शासनाच्या धोरणात शेतकऱ्यांसाठी मारक ठरत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. महागड्या व नामांकित कंपनीचे बियाणे परवानाधारक कृषी केंद्रातून घेतल्यानंतरही उत्पादन निघाल्यावर आपली फसगत झाल्याची अनेक प्रकरणे उघड की शेतात तेव्हा शेतकऱ्यांना मनस्ताप शिवाय काहीही मिळत नाही.

## डी फार्म प्रथम वर्षाच्या परिक्षेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**तिरोडा :** प्रगत विद्या फाउंडेशनच्या द्वारे चालविल्या जाणाऱ्या इम्पेरियल कॉलेज ऑफ फार्मसी येथील डि.फार्म प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी मे २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण मंडळ मुंबई यांच्याद्वारे घेतलेल्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले.या परीक्षेत हर्षल टन्नूलाल छत्तांनी याने ८५.५ टक्के गुण घेत प्रथम क्रमांक पटकाविला तर द्वितीय क्रमांक वैष्णवी नरेंद्र येळे हिने ७५.४ टक्के आणि आता तृतीय क्रमांक आस्था जगदीश असाठी हिने ६६.८ टक्के गुण मिळवून पटकावला. या यशाबद्दल इम्पेरियल कॉलेज ऑफ फार्मसी चे विश्वस्त मंडळ,प्राध्यापक वर्ग आणि कर्मचारी वर्ग यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.प्रगत विद्या फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. भूपेंद्र भोंगाडे, सचिव शिवशंकर बोपचे तसेच विश्वस्त यांनी विद्यार्थ्यांचे त्यांच्या पालकांचे आणि प्राध्यापक वर्गांचे अभिनंदन केले आहे.

: आरएनआय रजिस्ट्रेशन क्रमांक :
No-MAHMAR 2011/40516
महासागर गोंदिया
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय : शुभमंगल कार्यालय, एलआयसी ऑफीसजवळ, गणेशनगर, गोंदिया येथून प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन-०७१२-२७६७२८, ९३७३११७०४२ स्थानिक संपादक : जयंत मदनलाल शुक्ला, फोन ९८२२३८६९९९ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील)

